## उद्यानविद्या विभाग (प.म.), मफुकृवि, राहुरी विभागाच्या जडवस्तुंच्या जाहिर लिलावाच्या नियम व अटी

१. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्याला लिलावात सहभागी होण्यासाठी लिलावाच्या दिवशी (लिलावाच्या आधी) रक्कम रु. १०००/- अनामत स्वरुपात भरावे लागेल. अनामत रक्कम न भरल्यास लिलावाच्या बोली प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

२. अनामत रक्कम भरलेल्या व्यक्तीसच लिलाव बोली बोलणे बंधनकारक असेल.

३. लिलावात बोली बोलताना ती रु. ५००/- च्या पटीत वाढीव स्वरुपात बोलावी लागेल.

४. लॉट साठीची अपेक्षित बोली किंमत आल्यावरच साहित्य लॉटची विक्री केली जाईल.

५. उच्चतम बोली रक्कमे व्दारे साहित्याचा लॉट खरेदी करण्यास लॉट खरेदीची संपुर्ण रक्कम ही रोख स्वरुपात त्याच दिवशी लिलावस्थळी जमा करावी लागेल. त्या खेरीज साहित्य ताब्यात दिले जाणार नाही.

६. उच्चतम बोली रक्कमेस एखाद्या लॉटची खरेदी लॉट न उचलना-या खरेदीदाराची अनामत रक्कम परत न करता ती जप्त केली जाईल.

७. बोली व्दारे विकत घेतलेले साहित्य त्याच दिवशी घेऊन जाणे बंधन कारक असेल. विक्री झालेल्या लॉट मधील साहित्यांची कुठलीही जबाबदारी या कार्यालयाची नसेल. त्याच दिवशी न उचलल्यास त्या पुढील दिवसापासून प्रती दिन प्रति लॉट रु. १००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

८. बोली व्दारे लॉट खरेदी करण्यासाठी कार्यालयाकडे जमा असलेली अनामत रक्कम संबधीतास परत न करता ती रक्कम उच्चतम बोली रक्कमेचा भरणा करताना कार्यालयामार्फतच वजा करण्यात येईल.

९. बोली व्दारे साहित्य लॉट खरेदी केला. परंतु लॉट साठीच्या उच्चतम बोली रक्कमेचा भरणा त्याच दिवशी संबंधीतांनी केला नाही तर संबधीत व्यक्तीची कार्यालयाकडे जमा अनामत रक्कम परत न करता ती जप्त केली जाईल.

१०. लिलावा व्दारे घेण्यात येणारे साहित्य वापराची संपुर्ण जबाबदारी ही साहित्य घेणाऱ्याची असेल.

११. लिलावा बाबतच्या विहित कार्यपध्दती पार पाडण्यासाठी साहित्य ताब्यात घेते वेळी लॉट घेणाऱ्या संबंधीतास कार्यालयीन हमीपत्र भरुन देणे बंधनकारक असेल.

१२. उच्चतम बोली रक्कमेस एखाद्या लॉटची विक्री झाली असेल परंतु संबंधीत बोली धारकाने तद्नंतर सदरील रक्कमेस साहित्य लॉट खरेदीस नकार दिल्यास सदरहु लॉट लिलाव प्रक्रियेस भाग घेतलेल्या इतर इच्छुक व्यक्तीस अगोदरच्या उच्चतम बोली किंमतीस देण्यात येईल.

१३. विक्री मुल्यावर नियमानुसार वस्तु व सेवा कर GST/IT भरण्याची सर्वस्व जबाबदारी लॉट खरेदी धारकाची राहिल.

१४. खरेदी धारकास खरेदी रक्कमेवर नियमानुसार सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहिल त्यातुन कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

१५. बोली रक्कम हि GST/IT करांव्यतिरिक्तची असेल. त्या अंतीम बोली रक्कमेवर लिलाव उचलणा-या व्यक्तिस शासनाने निर्धारीत केलेला GST/IT कर रक्कम स्वत: भरावी लागेल.

१६. संबंधित लिलाव साहित्य लिलाव स्थळापासुन उचलुन घेऊन वाहतुक करण्याची जबाबदारी संबंधीत लिलाव उचलणा-या व्यक्तीची राहिल परंतु या वाहतुकीत विद्यापीठाच्या कोणत्याही मालमत्तेस हाणी पोहचल्यास संबंधीत बोलीदार (लिलाव लॉट घेणारा) व्यक्तीकडून नुकसानभरपाई आकारण्यात येईल.

१७. लिलावाचे साहित्य बोलीदाराने फक्त कार्यालयीन कामकाजाच्या दिवसातच सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत उचलणे बंधनकारक राहिल.

१८. खरेदीदाराने आधारकार्ड व पॅन कार्डच्या छायांकीत प्रती रक्कम भरतेवेळी कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राहिल.

१९. खरेदीप्रक्रिये बाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे क्षेत्र राहुरी राहिल.

२०. लिलाव प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार हे मा. अध्यक्ष, लिलाव समिती तथा प्रमुख, उद्यानविद्या विभाग, व गठित लिलाव समितीस राहतील.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष
लिलाव समिती तथा
प्रमुख
उद्यानविद्या विभाग,
म.फु.कृ.वि., राहुरी